इयत्ता : बारावी [ STD. XII] : मराठी (109) [ Marathi ]
द्वितीय सत्र नमुना प्रश्न-पत्रिका : 2021- 22 [Sample paper : 2021- 22 ]

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

सर्वसाधारण सूचना :

१. या प्रश्नपत्रिकेत - अ,ब,क,ड – असे चार विभाग आहेत.
२. सर्व विभाग आवश्यक आहेत.
३. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
४. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग : अ [आकलन]

प्रश्न १) पुढील परिच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी मलाला युसुफजाई जगाच्या नजरेत आली. मुलींना शिकता यावे या उद्देश्याने पछाडलेल्या मलालावर तालिबानी अतिरेक्यांनी जीवघेणा हल्ला केला. ती जवळपास मरणाच्या दारात जाऊन परत आली. मात्र तेव्हापासून ती सगळ्यांच्या कौतुकाचा विषय बनली.

स्वात खोरे म्हणजे पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या सीमावर्ती परिसरातील प्रदेश. टोळीवाले, पश्तून, तालिबानी यांचा वावर असलेला हा प्रदेश. अगदी कट्टर इस्लामी वातावरण. अशा ठिकाणी मुलींनी शिकण्याची कल्पनाही धर्मबाह्य मानली जाई, तिथं ही एवढीशी चिमुरडी मुलींनी शिकावं म्हणून प्रयत्न करत होती. बीबीसीच्या उर्दू प्रसारणासाठी ब्लॉग लिहित होती. प्रथम पोरवय म्हणून मोठ्यांनी दुर्लक्ष केले परंतु सांगूनही ऐकेना तेव्हा दटावणी, धमकावणी आदि प्रकार सुरु झाले. तरीही ऐकेना,तेव्हा मात्र तिला थेट संपवण्याचाच प्रयत्न झाला. तिच्या डोक्यात गोळी लागली. त्यातून ती वाचली. हे आश्चर्यच होते. अनेक महिने ब्रिटनमध्ये तिच्यावर उपचार करण्यात आले.

जगाने तिला डोक्यावर घेतले. तिच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली. परंतु स्वात खोऱ्यात सहानुभूती तर दूरच; उलट तिरस्कार आणि अवहेलनाच पदरी पडली.

संयुक्त राष्ट्र सभेमध्ये शेकडो प्रतिनिधींसमोर मलालाने केलेले आत्मविश्वासपूर्वक भाषण आजही अनेकांच्या पक्के स्मरणात आहे. 'अतिरेक्यांना वाटले आपण तिचे उद्दिष्ट आणि महत्वाकांक्षा संपवून टाकू प्रत्यक्षात अतिरेक्यांच्या हल्ल्यामुळे आमच्यातील भीती, अगतिकता आणि दुर्बलता संपली आणि शक्ती व धैर्याचा जन्म झाला.' – असे वास्तववादी विचार मलालाने मांडले, तेव्हा सगळ्यांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात तिला मानवंदना दिली. इतकी खंबीर आणि कणखर मलाला जीवघेण्या हल्ल्यानंतरही अगदी तालिबानचाही द्वेष करत नाही. –'मला ज्याने गोळी घातली तो माझ्यापुढे आला आणि माझ्या हातात बंदूक असली तरीसुद्धा मी त्याच्यावर गोळी घालणार नाही.' या तिच्या उद्गारांनी तर अवघे जगच जिंकून घेतले.

दुसरीकडे मलालाला आपल्या घरी, गावी परतणे मुश्कील होऊन बसले आहे. ती परत गेली तर अतिरेकी तिला मारून टाकतील हे नक्की आहे. या परस्परविरोधी वातावरणात मलाला मात्र आपल्या विचारांवर ठाम आहे. शांततेसाठीचे नोबल पारितोषिक मिळवून मलालाने एक इतिहास रचला.

प्रश्न :

1] मलालाला संपवण्याचा प्रयत्न का झाला? सविस्तर लिहा. (3)

2) संयुक्त राष्ट्र सभेमध्ये मलालाला कोणते विचार व्यक्त केले ? (2)

3) शांततेसाठीचे नोबल पारितोषिक मिळण्यामागे तिचे कोणते विचार कारणीभूत आहेत ? (2)

## विभाग : ब [लेखन]

प्रश्न 2) पुढीलपैकी एका विषयावर अंदाजे 80/100 शब्दांत आपले मत किंवा विचार मांडा (5)

1] खेळांचे महत्त्व

2] समाज घडवण्यात युवकांची जबाबदारी

3] उन्हाळ्यातील मौजमजा

4] नोकरी की व्यवसाय ?

प्रश्न 3) पुढीलपैकी एका बातमी आधारे एक वृत्तलेख लिहा. ( अंदाजे 50/60 शब्दांत) (5)

'टोकियो ऑलिंपिकमध्ये नीरज चोप्रा याने भालाफेक यामध्ये सुवर्णपदक मिळवले.' –

**अथवा**

'खानावळ चालवून मुलाला केले जिल्हाधिकारी'

## विभाग : क [गद्य – पद्य पाठ]

प्रश्न 4 अ) पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. ( प्रत्येकी सुमारे 35/40 शब्दांत) (4)

1] रेशीमबंध पाठात उत्तररात्रीच्या आगमनाची कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ?

2] पहेलवान परशाचा 'बकरा' कशामुळे व कसा झाला होता ?

3] घाणेरी आणि चाफ्याच्या फुलांची कोणती वैशिष्ट्ये लेखक यू.म.पठाण यांनी सांगितली आहेत?

4] आपल्या देहातील अवयव आणि दात यातील कोणते फरक लेखकाने सांगितले आहेत ?

आ) पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे 70/75 शब्दांत लिहा. [3]

1) पहाटेच्यावेळी बागेत गेल्यावर लेखकाला फुलांसंदर्भात कोणकोणते अनुभव आले ?

2) दातादुखीमुळे लेखकाचे आध्यात्मिक तत्त्वचिंतन कसे होते ?

3) ) 'रेशीमबंध' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

प्रश्न 5 अ) कोणत्याही एका प्रश्नाचे सुमारे 35/40 शब्दांत उत्तर लिहा. [2]

1) कवयित्री हिरा बनसोडे यांनी पूर्वीच्या स्त्रीचे वर्णन कसे केले आहे ?

2) "कामक्रोध विंचू चावला, तम घाम अंगासी आला" या ओळींचा सरळ अर्थ लिहा.

3) आरशातील स्त्रीने अधिकारवाणीने काय सांगितले ?

आ) पुढीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर सुमारे 70/75 शब्दांत लिहा. [3]

1)भारुड म्हणजे काय ते सांगून 'विंचू चावला' या भारुडाचा भावार्थ लिहा.

2) संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. –

'आरशातील स्त्रीने मला विचारले, 'तूच ना ग ती !'
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली,
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य .... !

3) पुढील ओळींतून संत एकनाथ यांना काय सांगायचे आहे ते स्पष्ट करा.

" ह्या विंचवाला उतारा | तमोगुण मागे सारा |
सत्त्वगुण लावा अंगारा | विंचू इंगळी उतरे झरझरा ||"

प्रश्न 6) अहवालाचे स्वरूप थोडक्यात लिहा . (3)

**किंवा**

अहवाल लेखनाची आवश्यकता स्पष्ट करा.

## विभाग ड : व्याकरण

प्रश्न 7) सूचनांप्रमाणे उत्तरे लिहा.

1)अधोरेखित शब्दाऐवजी योग्य समानार्थी वापरा.) (2)

अ]नरसोपंताने भक्तिपूर्ण कवन रचले.

ब] मंजुळाचे कौतुक पाहून रियाला खूप इर्षा वाटली.

2) पुढे काही वाक्ये दिली आहेत. त्या वाक्यांत कंसात दिलेल्या वाक्प्रचारांपैकी योग्य त्या वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (2)

[ चारी मुंड्या चीत होणे, नक्षा उतरणे, शंख करणे मन समेवर येणे.]

अ] पंडित महोदयांना आपल्या बुद्धिमत्तेचा खूप गर्व होता,पण त्या नवतरुणांने त्याचे गर्वहरण केले.

ब] शिवाजी राजाच्या शे-सव्वाशे मावळ्यांच्या पराक्रमापुढे मुघलांची बलाढ्य सेनाही पराभूत झाली.

3) शेतकऱ्यांनी फुलांची रोपे लावली. ( प्रयोग ओळखा.) (2)

किंवा

त्यांचा तहानलेला जीव शांत केला. ( कर्तरी प्रयोग करा.)

4) मी खिडकी हलकेच उघडतो. ( कर्मणी प्रयोग करा.) (2)

किंवा

सैनिक शत्रूला रोखतात. ( भावे प्रयोग करा.)

#############